Historicity Research Journal
Volume 1 | Issue 4 | Dec 2014 ISSN:- 2393-8900

Research Article

डॉ. बाबासाहेबांचे शेती सुधारणेविषयीचे योगदान

पठाण झेड. ए.

(संशोधन मार्गदर्शक व विभागप्रमुख)
कला , विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, बदलापूर, जि. जलना .(महाराष्ट्र)

सारांश :

आधुनिक भारताचे शिल्पकार, प्रचंड ज्ञानसंपदा आणि सर्वसामान्य माणसाच्या उध्दारासाठी झटणारे महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर संपूर्ण भारताचे दैवत्वच होते.

प्रस्तावना :

सामाजिक जाणिवेतून जातीयताविरूध्द त्यांनी आवाज उठविला. मागास जातीच्या उध्दारासाठी आपले संपूर्ण आयुष्य पणाला लावले.फक्त दलितोध्दारक न बनता त्यांनी भारतातील सर्वसामान्य मानणासाठी विविध उपाययोजना सरकारपुढे मांडल्या. भारत हा कृषीप्रधान देश असल्यामुळे येथे राहणारा शेतकरी सुधारला पाहिजे. मग तो कोणत्याही जातीचा असो, त्याला मालकी हक्क मिळावे, त्याला कर पध्दतीत सवलत मिळाली. जुने शेतीचे अवजारे टाकून नवीन साधने मिळावी, ज्यामुळे शेतीचे उत्पादन वाढेल. वाढत्या लोकसंख्येमुळे जमीनीचा आकार कमी कमी होत असून उत्पादकता वाढत नाही. त्यामुळे जमिनीची धूप होउून तिची उत्पादकक्षमता घटली आहे. या सर्वांवर सरकारसुध्दा मोठया प्रमाणात जबाबदार आहे. कारण मालकी हक्क जमीनदाराकडे आहे. महसुलीचा कर प्रत्यक्ष राबणारा शेतकरी भरतो. महागाईने त्याचे जीवन अधिकच दयनिय बनते. या सर्वावर डॉ. बाबासाहेबांनी खालील उपाय सुचविले.

1) लहान आकाराच्या शेती समस्येचे निवारण–

डॉ. बाबासाहेबांनी 1918 मध्ये भारतात होत जाणाऱ्या शेतीच्या छोटया छोटया आकारावर नियंत्रण करण्यासाठी एक (Small Holdings in India and their Remedies) उपाय सुचविला. एडमस्थिम म्हणतो ,'जेव्हा भूमिका उपजिविकेचे साधन मानले जाते तेव्हा प्रत्येक मुलाला समान वाटा मिळावा . या हेतूने कर्ता व्यक्ती म्हणून वडिल त्याचे समान तुकडे करतो व त्यातून भूमिच तुकडे बनून शेतीचा आकार लहान होत जातो. यातून गृहकलह संपत्ती संघर्ष वाढला म्हणून ज्येष्ठ पुत्राला अधिकार देण्याचा कायदा करावा लागला. बाबासाहेबांच्या मते, इंग्लंड देश मोठया आकाराच्या शेतीचा आहे. फ्रान्स, हॉलंड, डेन्मार्क येथे लहान आकाराची शेती वाढत आहे. त्यांनी 1896–97 व 1900–1901 या दोन वर्षाच्या काळातील सर्व्हेनुसार भारताची स्थिती अशी होती.

शेतीचा आकार (एकारमध्ये)

वर्ष	आसाम	मुंबई	मध्य प्रांत	म्द्रास
1896–97	3.37	24.07	17	7
1900–01	3.02	23.9	48	7

यावरून आधुनिक भारताच्या पूर्वकाळातच शेतीचा आकार लहान झालेला होता. बडोदा, कडी, नवसारी , अमरेली इ. ठिकाणी सर्वेक्षण झाल्यावरही हिच परिस्थिती आढळली. या सर्व्हेवरून बाबासाहेब म्हणतात, शेतीचे होत जाणारे लहान आकार

भारतीय कृषि व्यवस्थेला अत्यंत हानिकारक आहे. या देशात भूखंडाचे तुकडे होत असून लहान आकाराच्या भूमि निर्माण होत आहे. ती अलिप्त होते व तिचा उत्पादन घटत आहे. ही बाब लक्षात आल्यावर भूखंडाचे आकार वाढविण्यावर जोर देण्याचे पर्यटन सर्वत्र होत आहे आणि त्यातून उत्पादन वाढेल असा गैरसमज होउुन उपाययोजना केली जात आहे.

बाबासाहेबांच्या मते, भूखंडाचा आकार कमी होण्याचे कारण केवळ वंशाचा अधिकार हा कायदा आहे. समजा एका व्यक्तीकडे दहा एकर जमीन आहे व त्याला चार पूत्र आहे तेव्हा समान वाटणीतून प्रत्येक 2 1/2 एकर जमीन येईल व भूमीचा आकार लहान होईल. म्हणजे याला लोकसंख्या जबाबदार आहे. तिच्यावर नियंत्रण करणे सरकारचे अद्यकर्तवय आहे. भूमीचा आकार लहान खाणारी लोकसंख्या जास्त त्यामुळे वाजवीपेक्षा जास्त उत्पादन काढण्याच्या प्रक्रियेमुळे जमिनीची धूप होते. हे जर थांबवावयाचे असेल तर विविध योजना आखून आदर्श कृषि योजना तयार केली पाहिजे. बाबासाहेब म्हणतात , शेतकऱ्याकडे केवळ शेताचे आकार महत्वाचे नसून त्यात त्याने केलेले श्रम त्यावर केलेला खर्च याचाही समायोजन झाले पाहिजे. शेतीचा आकार छोटे म्हणून उत्पादन कमी झाले असे नव्हे तर श्री. के . एल. दत्ताच्या सर्वेक्षणाती अहवाल सांगतो, 'ज्या भारतीय सुशिक्षित शेतकऱ्याकडून विचारपूस केल्यावर असे कळाले की, शेतीची योग्य मशागत न झाल्यामुळे उत्पादन घटले. याला अनेक कारणे आहेत. जसे शेती करायचे अवजारे , बैल , पशु आणि शेतमजूर यांच्यात महागाई वाढली. त्यामुळे पूर्वीसारखी शेतीची मशागत होत नाही. नैसर्गिक खते राहिली नाहीत. विहिरीचे जलसिंचन योग्य पध्दतीने न होता त्याचा दुरूपयोग जास्त होउु लागला आहे. काम करणाऱ्या मजूरांचा तुटवडा आहे. योग्य खतांचा पुरवठा मिळत नाही त्यामुळे सर्व चांगले करण्यासाठी शेतकऱ्याकडे पैसा नाही त्यासाठी सरकारने गरीब शेतकऱ्यासाठी धन उपलब्ध करून दिले पाहिजे. शेतकऱ्याकडे मालवाहू गुरेढोरे नाहीत किंवा कित्येक शेतकऱ्याकडे बैलजोडीसुध्दा नाही. एक बैल स्वतःचा व दुसरा इतर मित्र अगर नातेवाईकांचा घेउुन उसणवार शेती करतो. यासाठी सरकारने त्यांना आर्थिक मदत करणे गरजेचे आहे.

लहान आकाराच्या शेतीमुळे निर्माण झालेल्या समस्याची कारणेः

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी छोटया आकाराच्या शेतीतून निर्माण झालेल्या अनेक समस्यावर मात करण्यासाठी काही उपाययोजा सांगितल्या.

1) शेतीचा विकास करण्यासाठी कृषिधनाची जपवणूक केली पाहिजे.
2) शेतीचा आकार कमी कमी होत जाणे याला प्राथमिक स्वरूपाची सामाजिक समस्या जबाबदार आहे. तिच्या मुळाशी जावून योग्य ती उपाययोजना अंगिकारली गेली पाहिजे.
3) लोकसंख्येच्या पटीत भूमी कमी आहे. वाढत्या लोकसंख्येनुसार शेतीक्षेत्राचा आकार वाढला पाहिजे. ओसाड , डोंगरपायथ्याशी असणाऱ्या जमीनीची मशागत केली पाहिजे.
4) शेतीच्या प्रतवारीत लोकसंख्येचे मूल्यमापन झाले पाहिजे व आवश्वक तेच उत्पादन घेउुन समतोल राखला पाहिजे.

स्न 1884 च्या सर जेम्स कॅर्डच्या अहवालात म्हटले आहे की , इंग्लंडमध्ये ज्या वर्गाकडे शेती केली जाते त्यात 50 व्यक्ती काम करतात. त्यात 25 युवक व वृध्द पुरूष महिला मिळून 25 स्त्रियांचा समावेश असतो. म्हणजे काम करणारे सर्वच जण असतात. बसून खाणारे कमी त्यामुळे उत्पादकता अधिक होते. यांच्या अगदी उलट भारतात आहे. जर भारत एक वर्ग त्याच्या चार पटीने दोनशे लोक शेती करत असतील तर एक तृतीयांश लोकसंख्या लागेल आणि एक तृतीयांश लोकसंख्या शेती कामासाठी घेतली तर त्याच्या दुप्पट लोकसंख्या त्यावर बसून खाणाऱ्याची राहील. त्यामुळे बसलेल्या कामगार व्यक्तीचा शेतीवर विपरीत परिणाम होतो. यावरून बसून खाणारे कारागीर, कामगार किंपा व्यक्तीच्या वर्गाला शेतीपेक्षा इतरत्र व्यवसायात गुंतवले व त्याच्याकडून बिगरशेतीची कामे किंवा औद्योगिक क्षेत्राकडे लावले तर ह्या वर्गाचा शेतीवर पडणारा ताण कमी होईल.
5) तर भारतातील शेतीवरील समस्या नष्ट करावयाची असेल तर आपल्या देशात बिगरशेतीचे उद्योगधंदे , औद्योगिकरणाला सुरूवात करावी लागेल.

अशा पध्दतीने दिवसेंदिवस शेतीचा आकार कमी होत गेल्यावर सरकारने चकबदीचा कायदा करण्यात आला. त्यावरही बाबासाहेबांनी भाष्य केले.

चकबंदी कायदा–

शेतीच्या विभाजनावर नियंत्रण करण्यासाठी चकबंदी कायदा करण्यात आला. त्यामुळे दोन प्रश्न निर्माण झाले.

1) सध्या स्थितीतील छोटया छोट्या विभाजित पडलेल्या भूमीला रेखांकन करणे.
2) चकबंदी झाल्यावर त्या भूमीचा आकार आहे तसाच ठेवणे. यावरून चकबंदी कायदा संमत झाल्यावर तिची अंमलबजावणी दोन सिध्दांतावर करावी असे ठरले.

अ) आर्थिक लाभकारी क्षमता
ब) मुलस्वामित्व पध्दती

या दोन सिध्दांताचे विश्लेषण बडोदा कमिटीने केले ते असे–

अ) मुख्य शेतीची मोजणी करणे त्यानंतर त्याच्या सिमा व सरहद्दी मिटून टाकणे. रस्त्यासाठी काही खुणगाठ करणे , सार्वजनिक उपयोगासाठी काही जमिनीचा तुकडा वेगळा करणे , उरलेल्या भूमित प्लॉट पाडणे , प्रत्येक नवीन प्लॉटचा आकार एवढा असावा की, जमीन, मशागती व उत्पादनासाठीचे लाभधारक नेणे गरजेचे आहे. किमान ते एवढे असावे की, एका परिवाराचे वर्षभराचे उदारनिर्वाह होउु शकेल. ही सर्व प्लॉट हर्राशीने जुन्या भूमिमालकांनाच विकली जावी. ज्यामुळे शेतमजूरांचे विभाजन न होता ते त्यापासून दूर जाणार नाही त्यांना कायम एकाच ठिकाणी काम मिळत राहील.

ब) जेव्हा चकबंदी लागू करावयाचे ठरल्यास तेव्हा सर्व खातेदाराची व सर्वभूमीची एक सूची बनविली जावी. त्याला गावातील पंच बाजाराच्या भावाप्रमाणे शेतीचे मुल्य (किंमत) ठरवतील मग जमिनीचे पुनर्वितरण करावे. प्रत्येक खातेदारास त्याच्या किंमतीप्रमाणे प्लॉट देण्यात यावे. या पध्दतीने एकही खातेदार भूमिपासून वंचित राहत नाही. त्यामुळे भूमीचे विभाजन थांबते. या अहवालावर डॉ. बाबासाहेब म्हणतात, चकबंदी झालेल्या भूमिचा तुकडा हा मोठया आकाराचा असावा. कारण, या देशात छोटया , छोटया तुकडयावर उदरनिर्वाह करणारे असंख्य शेतकरी आहेत. त्याची जमिनीचे तुकडे संपतील. जर आकार मोठा करावयाचा असेल तर त्यासाठीच्या योजना अंगिकारणे गरजेचे राहील. अशाच प्रकारे बाबासाहेबांनी 1920 मध्ये महार वतनभूमि, खेती कायदासारखे कायदे करावयास भाग पाडले. त्यासाठी 1928 मध्ये विधानसभा मुंबईत त्यांनी एक बील प्रस्थापित केले. शेतकऱ्याचे नेतृत्व करताना 10 जानेवारी 1938 रोजी मुंबई कॉग्रेस सरकारच्या समोर डॉ. बाबासाहेबांनी मागण्या टाकल्या.

1.शेतकऱ्याच्या हितासाठी प्रत्यक्ष जो शेती करतो त्यातील उत्पादनावर त्याचाच अधिकार राहील.
2.शेतीची मशागत करणाल्या शेतकऱ्यांना न्याय मिळावा व त्याची आर्थिक स्थिती सुधारावी, त्याच्या हितांचे रक्षण जरूरी आहे. जमीनदार वर्गाचा वर्चस्व कमी होणे गरजेचे आहे.
3.कोणत्याही शेतकऱ्यावर कर महसूल लावव्यापूर्वी त्याच्या उपजिविकेसाठी असणारे उपयुकत साध्य देण्याचे कर्तव्य सरकारने करावे.
4.लोकनियुक्त सरकारने शेतमजूरांच्या वेतनासाठीचा कायदा करून त्यांच्या हिताचे रक्षण केले पाहिजे.
5. ज्याप्रमाणे महसुलात सवलत दिली त्याप्रमाणे भूमिचे अधिकार राजस्वसुद्धा माफ करण्यात यावे.
6. खेती जमिनदारी पद्धती, इमान व जमीनदारी पद्धत आर्थिक दृष्टीने नुकसान देणारी किंवा समाजिक दृष्टीने अमानवी पद्धतीला देयक स्वरूपाचे कायदे राबविले जावेत.
7. किमान एक वर्षापर्यत प्रत्येक शेती कारणा–याला मालकी हक्क देण्यावर सरकारने कायदा बनवावा. हा कायदा सर्व जमीनदारांना वंशजातीवर बंधनकारक केले जावे. एखादा जमीनदार हा कायदा सर्व जमीनदारांना वंशजातीवर बंधनकारक केले जावे. एखादा जमीनदार हा कायदा मोडणारा नाही. यासाठी Land Commission बनवावे. जोपर्यत शेतकरी कर देत आहे तोपर्यत त्याला मालकी हक्कापासून दूर करू नये.
8. किमान एका वर्षाच्या आत सरकारने प्रत्येक शेती कसणा–याला मालकी हक्क देण्याचा कायदा करावा व तो प्रत्येकाला बंधनकारक करावा. एखादा वतनदार, जमिनदार हा कायदा तोडणार नाही यासाठी Land Commissionबनवावे. जोपर्यत शेतकरी कर देत आहे तोपर्यत त्याला मालकी हक्कापासून दूर करू नये.
9. पाण्याचा कर 50 टक्के लहान शेतक–यांना कमी करावा. सिंचनाच्या कायदेत बदल गरजेचे आहे किंवा लहान शेतकरी व जमीनदारांना प्रत्यक्ष शेतीची मशागत करणा–यांना लाभदायक ठरले असे नियम बनवावे.
10. सर्व खेडयात मोफत चारासंघ व जंगल असावे किंवा तशी उपलब्धता करून द्यावी.
11. शेतक–याच्या जमिनी सावकारापासून वाचविण्यासाठी प्रतिबंध लागणे गरजेचे आहे.
12. सर्व तरूण स्त्री–पुरूषांना मतदानाचा अधिकार असावा.
13. बेगारी, मजदूर किंवा पैशाचा गैरव्यवहार करून पैसा वसूल करणा–या सावकारावर फौजदारी अपराधाचे गुन्हे मानले जावे.
14. भूमिराजस्वी निगडीत विकासाचे कायदेविषयक अधिकार समाप्त केले जावेत.

तत्कालीन मुख्यमंत्री खेर यांनी शेतक–याच्या प्रतिनिधीमंडला मागण्यावर ठोस उचलता आली नाही. त्यामुळे घोर निराशा झाली. त्याचा परिणाम शेतकरी, मजूर व कॉग्रेस सरकारमध्ये संघर्ष झाला.

निष्कर्ष :

डॉ. बाबासाहेबांनी केवळ दलितोद्धाराचे कार्य केले नसून इतर समाजातील समस्येंना वाचा फोडली. शेतक–याच्या हितासाठी जलसिंचन, नदीजोड प्रकल्प आणि लहान आकाराच्या भूमिचे रक्षण व संवर्धन करण्यावर भर दिला. त्यासाठी संसदेत आपले मत मांडून बील पास करावयास लावले. त्याच्या चिंतनाचा विषय सर्वसामान्य व्यक्ती जो असंख्य समस्येवर मात करीत जीवन जगत असतो. त्याला केंद्रबिंदू मानून बाबासाहेबांनी अनेक लोकोपयोगी कार्य केले.

संदर्भः

1. डॉ. भूणगेकर ल.भा., डॉ. बाबासाहेब आंबेडकर गौरवग्रंथ, महाराष्ट्र राज्य साहितय आणि संस्कृती मंडळ, मुंबई, 1993, पृष्ठ 379.
2. डॉ. बाबासाहेब आंबेडकर वाङमय, खंड–2, पृष्ठ 246 व वेल्थ ऑफ नेशन्स बूक–3, अध्याय–11.
3. ''डॉ. बाबासाहेब आंबेडकर संपूर्ण वाङमय'', खंड–2, डॉ. आंबेडकर प्रतिष्ठान, सामाजिक न्याय आणि अधिकारिता मंत्रालय, 2 नोव्हें. 1993, न्यू दिल्ली भारत सरकार.
4. उपरोक्त, पृष्ठ 250.
5. कित्ता, पृष्ठ 259.
6. कित्ता, पृष्ठ 260.
7. कित्ता, पृष्ठ 262.
8. कित्ता, पृष्ठ 263.
9. कित्ता, पृष्ठ 264.
10. कित्ता, पृष्ठ 266.
11. कित्ता, पृष्ठ 267.
12. कॅडजेम्स 'इंडिया द लॅनड एंड द पीपल, पृष्ठ 225.
13. डॉ. आंबेडकर संपूर्ण वाङमय, खंड–2, पृष्ठ 271.
14. कित्ता, पृष्ठ 271.
15. कित्ता, पृष्ठ 250.
16. कित्ता, पृष्ठ 251.
17. कित्ता, पृष्ठ 252.
18. मैथ्यू, थॉमस, सावंत/ भारती, ''क्रांति प्रतीक आंबेडकर'', धम्म बूक डेपा प्रकाशन, न्यू, दिल्ली, 1994, पृष्ठ 50.
19. आझाद रामगोपाल, भारतीय श्रमि आंदोलन दशा, दिशा और दलित परिप्रेक्ष्य समता प्रकाशन,2003, पृष्ठ 29.
20. कित्ता, पृष्ठ 30.